Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-4 | Issue-2 | Aug-2014 Available online at www.aygrt.isrj.net

वीरशैव धर्माचा तात्विक दृष्टीकोन

वृषाली ओ. आंबटकर

तत्त्वज्ञान विभाग, श्री गुरूबुध्दी स्वामी महाविद्यालय, पूर्णा.

सारांश - धर्म हा जगातील सर्वच मानवी संस्कृतीचे महत्त्वाचे अंग होय. असे मानले जाते की, निसर्ग आणि मानवी जीवन नियंत्रित करणारी एखादी शक्ती असावी आणि त्या शक्तीची आपल्यावर कृपादृष्टी असावी याच अनुषंगाने मानवाने त्या शक्तीची उपासना सुरू केली. या संकल्पनेतूनच मानवी समाजात धर्म संकल्पनेचा श्रीगणेशा झाला.

प्रस्तावना-

मानवी जिवनाला सुसंस्कृत करणे, त्याचे विचार व आधार त्याप्रमाणेच मन व आत्मा यांच्या शुध्दीकरणाच्या प्रक्रियेने मानव विश्वकल्याणाचा जो विचार करतो तो विचारही केवळ धर्मामुळेच होय. धर्माला नैतिक वर्तनाचे स्फुर्तीस्थान मानले जाते. याचाच अर्थ असा होतो की, धर्म हा घटक मानवी जीवनाला असत्याकडून सत्याकडे, अंधाराकडून उजेडाकडे, गोंधळाकडून व्यवस्थेकडे, जीवाकडून शिवाकडे धर्मच नेतो. प्रत्येक धर्माला विशिष्ट स्वरूपाची तात्विक बैठक असते.

धर्माच्या दृष्टीकोनातून भारतासारख्या राष्ट्राचा विचार केला तर भारत हे राष्ट्र अनेक धर्मांनी व्यापलेले आहे. सर्वच धर्माचा एकमेकांशी घनिष्ट संबंध असल्यामुळे त्यांच्यामध्ये एकनिष्ठताही आहे. या अनेक धर्मामध्ये "वीरशैव" हा धर्म देखील अतिशय महत्त्वाचा धर्म होय. वीरशैव धर्माची विशिष्ट स्वरूपाची तात्विक बैठक त्या धर्माचे वैशिष्ट्य होय.

वीरशैव धर्माचा अर्थ :-

वीरशैव धर्माचा अर्थ स्पष्ट होण्याकरिता काही तज्ञ व्यक्तींनी व्याख्या केल्या आहेत. ज्यातून वीरशैव धर्माचा अर्थ स्पष्ट होतो.

१)डॉ.सुधाकर मोकलेवार - वीरशैव म्हणजे वीर, शुर, धैर्यशाली, शिवभक्त की जो लिगांग समस्यात रममान झालेला असतो.
२)टि.एच.एम.सदाशिवय्या - आगन ग्रंथानुसार अष्टावरण संपन्न आणि पंचाचार परायण असलेली व्यक्ती म्हणजे वीरशैव होय.
३)वीरशैव चंद्रीका ग्रंथातील श्लोक अर्थपूर्ण आहे. "निजलिंगांग सामरस्यरूप विशिष्टा हैतमतानिष्ठ एकोत्तरशत प्रभेदभिन्न षटस्थल ज्ञानसंपन्न त्रिविधवीर शैवदीक्षा संयुक्त. अष्टावरण पंचाचार परायण वीरशैव सर्वोत्तम."

४)सिध्दांत शिखामणी धर्म ग्रंथानुसार - "जीव-शीव ऐक्य मानणारे ते वीरशैव होत."
५)स्वातंत्र्यवीर सावरकर - लिंग पुजक ते लिंगायत होत. शिव व जीव यात फरक मानणारे वीरशैव. पेज नं.११ डॉ.सूर्यकांत घुमरे, वीरशैव व इतर धर्म आणि समाज दार्शनिक दृष्टीकोनानुसार वीरशैव शब्दाचा अर्थ

विद्यायां शिवरूपायां विशेषाद् गमनं यतः |
तस्मादे ते महाभाग वीरशैवा इतिस्मृतः ||१५||
वीरष्देनोच्छते विद्या शिवजीवैक्य बोधिका ||
तस्यां रमन्ते चे शैवा वीरशैवास्तुते मतः ||१६||
वेदान्तजन्यं यज्ञानं विद्येति परिकीर्त्यते |
विद्यायां रमते तस्यावीर इत्यभिधीयते ||१८|| सि.शि.परीछेदा

याचा अर्थ शिवजीवांचे अथवा लिगांगाचे एकत्व सांगणाऱ्या विद्येत जो शिवभक्त विशेषत्वाने रमतो (आनंद घेतो) तोच वीरशैव होय. पेज नं.२१.

धार्मिक दृष्टीकोनातून वीरशैवाचा अर्थ :-

इष्टलिंग वियोगे व व्रताना वा परिच्युते |
तृणवत् प्राणसंत्याग इतिवीरव्रतं मतम् ||
भवच्युत्साह विशेषोपि वीरत्वामिती कंथ्यते |
वीरव्रत समत्योगार वीरशैव प्रकिर्तीतम् ||
पेज नं.२५ - उद्यमशील वीरशैव लिंगायत मराठवाडा विशेषांक, जून १९९८.

वीरशैव धर्माची उत्पत्ती :-

वीरशैव धर्माची उत्पत्ती केव्हा झाली ? आणि याचे संस्थापक कोण आहेत ? या संदर्भात मोठ्या प्रमाणात मतभिन्नता आढळून येते. काही संशोधकांनी वेगवेगळया दृष्टीच्या आधारावर वीरशैव धर्माची उत्पत्ती व संस्थापक विशद केलेले आहेत.

शिव संस्थापित वीरशैव धर्म
पंचाचार्य संस्थापित वीरशैव धर्म
बसवेश्वर संस्थापित वीरशैव धर्म

वीरशैव हा धर्म त्याही धर्माचा केवळ एक पंथ, संप्रदाय नसून ते स्वतंत्र पूर्णतः असलेले दर्शन आहे. वीरशैव धर्माचे स्वतंत्र तत्वज्ञान आणि मानसशास्त्र होय. काही दर्शनकारांनी केवळ जडाच्याच आधारे विश्वाचे स्वरूप विशद करण्याचा प्रयत्न केला तर काही

दर्शनकारांनी केवळ चैतण्याच्याच आधारे विश्वाचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. वीरशैव तत्वज्ञानाची महती असामान्य आहे. वीरशैव हे एक अतिमानसशास्त्र आणि परिपूर्ण दर्शन आहे. वीरशैव हे विचार, परंपरा, सिध्दांत, तत्वज्ञान, समग्र जीवनविषयक दृष्टीकोन होय. या धर्म मताचे वैशिष्ट्य असे होय की, भौतिकता आणि अध्यात्मिकता भोग, मोक्ष या दोन्ही गोष्टी मिळवता येतात. यावरून त्यांचा जिवनाकडे पाहण्याचा शाश्वततावादी तसेच आशावादी दृष्टीकोन स्पष्ट होतो. या संदर्भातील पारमेश्वरागम या ग्रंथातील एक श्लोक महत्वपूर्ण होय.

व□ये शिवे वीरशैव सर्वोत्तमोत्तम्
नानरच दद्भवे द्योग्यंशाक्तेयं सर्वसंमत्म
वीरशैवमत सद्यो भोगमोक्षैक साध-नम्
सर्वोत्तम मत यत: सर्वोत्तमोसम्यहम
न वीरशैवसदृश्यं मतमायी जगस्त्रये
सर्व भागपर पुण्य शिवसायुज्यदायकम्

वीरशैव धर्माचा नैतिक (नितीशास्त्रीय) आधार :-

वीरशैव हा नैतिक दृष्टीकोनातून अत्यंत परिपूर्ण आहे. सामाजिक समता समन्वयता, नम्रता, दासोहप्रभा, कार्यकर्ता, उद्योगशिलता, अहिंसावृत्ती, आशावादी जीवनविषयक दृष्टीकोन इत्यादी वीरशैव नितीशास्त्राची प्रमुख लक्षणे आहेत. म्हणून या नैतिक मुल्यांची जोपासना करून प्रत्येक मनुष्याला आपली उन्नती साधता येते. या मुल्यांच्या आधारावर वीरशैव धर्माला विश्वधर्म म्हणूनही ओळखले जाते.

वीरशैव धर्माचा तात्विक दृष्टीकोन :-

वीरशैव तत्वज्ञान हे अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण होय. त्यामध्ये तर्कशास्त्र, मानसशास्त्र, धर्मशास्त्र अधिभौतिकशास्त्र यांचा सुसंगत व समर्पक अंर्तभाव झाल्याचे दिसून येते. शुन्य संपादन ही वीरशैव तत्वज्ञानाची मध्यवर्ती संकल्पना होय. जीव-शीव एकात्मता म्हणजे शुन्य संपादन होय. वीरशैव धर्म आणि तत्वज्ञानामध्ये प्रामुख्याने लिंगधारणा, अष्टावरण, पंचाचार, षष्टस्थल या चार मुलतत्वांचा प्रामुख्याने समावेश होतो.

१) लिं□धार□ा :-

वीरशैव धर्म आणि नैतिक दृष्टीकोनातून इष्टलिंग उपासनेला महत्वाचे स्थान आहे. ही अंगावर इष्टलिंग धारण करण्याची प्रथा अनादी कालापासून आहे. इष्टलिंगाच्या संदर्भात कुमार स्वामीजी म्हणतात - विश्वरचनाशास्त्र दृष्ट्या इष्टलिंग हे विश्वाचे प्रतिकात्मक स्वरूप आहे. इष्टलिंगाला शुन्य ही संज्ञा देखील आहे. कारण ते विश्वातील सर्व गुण विशेषा पलिकडे आहे. इष्टलिंग हे शिवशक्तीचे प्रतिक आहे. पाश्चात्य तत्वज्ञानात ज्या प्रमाणे सॉक्रेटीसने आत्मज्ञानाला म्हणजे स्वत:ला जागा याला महत्वाचे मानले त्या प्रमाणे वीरशैवाने आत्मज्ञान प्राप्तीसाठी इष्टलिंग पुजेला महत्वाचे मानले.

२) अष्टावरण :-

अष्टावरण ही वीरशैवाची ८ श्रध्दा तत्वे आहेत. धार्मिक आचारसंहिता म्हणजे अष्टावरण होय. आठ आवरणे म्हणजे अष्टावरण होय. ज्यामध्ये गुरू, लिंग, जंगम, पादोदक प्रसाद, विभूती, रूद्राक्ष, मंत्र यांचा समावेश होतो. अष्टावरण म्हणजे संरक्षणात्मक कवच होय.

१. **गुरू -** गुरू म्हणजे जो निर्गुण निराकार सर्वश्रेष्ठ होय. साधकांना इष्टलिंग दिक्षा देणे, पुजा विधी समजावून जीवशिव ऐक्याची शिकवण देणे हे तीन कर्तव्य प्रामुख्याने पार पाडावी लागतात.
२. **लिंग - परशिव शुन्य या नावानेही ओळखले जाते.**
३. **जंगम -** म्हणजे चल अथवा अस्थिर होय. अध्यात्मिक ज्ञान देणे हे जंगमाचे कर्तव्य होय. पादोदक शिवज्ञान म्हणजे पादोदक, शुध्द पाणी यालाही पादोदक म्हणतात.
४. **प्रसाद -** शिवाची साधकाला मिळालेली देणगी म्हणजे प्रसाद होय.
५. **विभूती -** विभूती म्हणजे भरभराट, संपत्ती शिवाची पवित्र राख यालाच भस्म असेही म्हणतात. विभुती हे वीरशैवाचे बर्हिगत प्रतिक होय. विभूतीमुळे वीरशैवाचे समानतेचे तत्व स्पष्ट होते. विभूती धारणा ही कोणताही भेदभाव मानत नाही.
६. **रूद्राक्ष -** रूद्राक्ष हे विशिष्ट वृक्षाचे बी होय. त्याचे ३८ प्रकार आहेत. रूद्राक्षाच्या अंतर्गत आणि बर्हिगत स्वरूपाविषयी कुमार स्वामीजी म्हणतात. अंतर्गत रूद्राक्ष म्हणजे साधकाने त्याचा दृष्टीकोन बदलून सर्व घटना व हालचाली मधील शिवाचे अस्तित्व जाणून घेणे होय. बाह्य रूद्राक्ष म्हणजे रूद्राक्षांची माळ गळयात परीधान करणे होय. अध्यात्मिक दृष्टीकोनातून ज्या प्रमाणे रूद्राक्ष धारणेला महत्व आहे, त्याच प्रमाणे वैज्ञानिक दृष्टीकोनातून महत्व आहे. त्वचा रोग बरा होतो, अपघाती व अकाली मृत्यु टळतो, रक्ताभिसरण, हृदय क्रिया बंद होणे, ताणतणाव वाढणे इत्यादी गोष्टीवर काही प्रमाणात नियंत्रण प्राप्त होते. रूद्राक्षाचे पाणी पिल्याने प्रकृती आरोग्य जनक राहते. मानसिक समाधान व मनोधैर्य वाढते.
७. **मंत्र -** मंत्र म्हणजे विशिष्ट पवित्र शब्द होय. अष्टावरण हे अध्यात्मिक दृष्टीकोनातून महत्वाचे आहे.

३) पंचाचार :-

सामाजिक दृष्टीकोनातून पंचाचार हे महत्वाचे तत्व होय. वीरशैवाचे सामाजिक नितीशास्त्र होय. पंचाचार हा सामाजिक जिवनाचा पाया आहे. वीरशैवांची आचारसंहिता होय.

लिंगाचार - कोणत्याही अडथळयाचा विचार न करता लिंग पुजा.
सदाचार - सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवणे. नितीशील अर्थार्जनाचा काही भाग दासोह स्वरूपात समाज बांधवांसाठी खर्च करणे सदाचार होय.
शिवाचार - समभाव, समताभाव, समतेचे तत्व होय.
गणाचार - अन्याया विरूध्द प्रतिकार करण्यास गणाचार प्रेरणा देतो.
कृत्याचार - सर्वाविषयी दया, मानवता व नम्रता भावनेने वर्तन करण्यास प्रवृत्त करणे होय.

४) षटस्थल :-

अध्यात्मिक दृष्टीने षटस्थल अत्यंत महत्वाचे आहे. अध्यात्मिक तत्व होय. ज्ञानमार्ग म्हणून षटस्थलाचा विचार केला गेला. यामध्ये सहा मार्गाचा समावेश होतो. षटस्थलाला मोक्ष मार्ग म्हणून स्विकारले गेले. षटस्थलामध्ये भक्तस्थल, महेशस्थल, प्राणलिंग स्थल, शरणस्थल, ऐक्य स्थल यांचा समावेश होतो.

वीरशैव तत्वज्ञान हे अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण होय. शुन्य संपादन ही वीरशैव तत्वज्ञानाची मध्यवर्ती संकल्पना होय. जीव-शिव एकात्मता म्हणजे शुन्य संपादन होय. हे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट मानले. "शुन्य" याला महत्वाचे मानले गेले. शुन्य म्हणजे सच्चीदानंद, परमानंद होय. शुन्य प्राप्ती म्हणजे शिव प्राप्ती होय. डॉ.हुनशाल म्हणतात, अंगागाचे लिंगागामध्ये रूपांतरण होणे म्हणजे शुन्य होय. याला आधुनिक मानसशास्त्रज्ञ उदात्तीकरण म्हणतात. मोक्षप्राप्ती म्हणजे शुन्य प्राप्त होय. शिव हे अंतिम सत्य होय. शिवात्म्याला शुन्य म्हटले आहे.

आत्मा व परमात्मा :-

वेदांताने ज्याला ब्रम्ह म्हटले आहे. आगमामध्ये याला शिव किंवा लिंग म्हटले आहे. जैन धर्माने याला शुध्दात्मा, बौध्द दर्शनाने निर्वाण म्हटले इस्लाम धर्मात याला अल्ला म्हटले आहे. धर्मशास्त्र ज्ञानी याला देव म्हटले आहे.

शिवयोग मोक्ष प्राप्तीचे साधन - मोक्ष प्राप्ती हे मानवी जिवनाचे अंतिम उद्दिष्ट होय. धार्मिक दृष्टीकोनातून मोक्ष प्राप्तीला महत्वाचे स्थान आहे. या अनुषंगाने वीरशैव धर्माने शिवयोगाच्या माध्यमातून मोक्ष प्राप्त करता येते असे मानले. इष्टलिंग उपासनेच्या आधारे शिवयो साधता येतो.

शक्ती विशिष्टदैत :-

हे वीरशैव धर्माचे तत्वज्ञान होय. या संकल्पनेला तात्विक दृष्टीकोनातून महत्वाचे स्थान आहे. या संदर्भात मंजाप्पा हर्डेकर म्हणतात, "ज्या तत्वज्ञानात्मक बैठकीवर वीरशैव धर्म उभारलेला आहे, त्यांना शक्ती विशिष्टादैत म्हणतात." शक्ती विशिष्टामध्ये परशिव, परशक्ती, प्रकृती व पुरूष या घटकांचा समावेश होतो. यामध्ये शिव-शक्ती यांचा अनन्य संबंध आहे. शिव हा शक्ती शिवाय व शक्ती ही शिवा शिवाय राहू शकत नाही. संत ज्ञानेश्वरांनी शिव आणि शक्ती यांच्यातील तादात्म्य संबंध म्हणजे शक्ती विशिष्टादैत म्हटले आहे. जीव आणि शिव यांच्यातील संबंधाला महत्वाचे स्थान आहे. जीव हा शिवाचाच अंश होय.

विश्व सं ल्प-ना :-

अंतिम सत्याची उकल हे तत्वज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट होय. विश्व निर्मितीच्या संदर्भात प्रत्येक तत्वज्ञानाने काही तत्वांचा स्विकार केला आहे. पंचतत्वांच्या माध्यमातून विश्वनिर्मिती झाली, हे काही तत्वज्ञानाचे मत आहे तर ॲनॅकझीमॅंडर पाश्चात्य तत्ववेत्याने केवळ पाणी हेच विश्वनिर्मिती तत्व मानले आहे. वीरशैव तत्वज्ञानाने विश्वनिर्मिती ही परशिवापासून झाली हा सिध्दांत मांडला. शिव आणि

शक्ती या दोन तत्वांच्या आधारे विश्वनिर्मिती झाली हे मा-नले. वीरशैव धर्माने विश्वाचे मिथ्यारूप मानले नाही. त्यांनी केवळ शिवसत्य जग सत्य मानले आहे. वीरशैव धर्मानुसार नाशवंत काहीच नाही. शिव हे अंतिम सत्य होय असे मानले.

जिवनविषयक दृष्टीकोन :-

वीरशैव धर्मीयांचा जिवनाकडे पाहण्याचा आशावादी दृष्टीकोन होय. समानता तत्वाला प्राधान्य दिले आहे.

नि-ष्र्ष :-

तत्वज्ञानाच्या क्षेत्रात वीरशैव धर्माचे तत्वज्ञान अतिशय महत्वपूर्ण होय. मानवतावादी दृष्टीकोन आणि समानतावादाचा पुरस्कार केला. शिवशक्तीच्या रूपात दोन तत्वांचा स्विकार करून अंतिम सत्य शिव होय, असे मानले. मानव विकासाच्या दृष्टीकोनातून वीरशैव धर्माचा तात्विक दृष्टीकोन महत्वपूर्ण आहे. या अनुषंगाने वीरशैव धर्माच्या तात्मिक दृष्टीकोनाची जाणीव समाज विकासात महत्वाची भूमिका बजावते, हेच स्पष्ट होते.

संदर्भ :-

१)डॉ.सूर्यकांत घुगरे, वीरशैव व इतर धर्म आणि समाज साधना बुक स्टॉल.
२)प्रा.पी.के.कुलकर्णी, भारतीय धर्म, विद्याभारती प्रकाशक.
३)प्रा.डॉ.आर.डी.साबळे, भारतातील थोर राजकीय विचारवंत.
४)उद्यनशील वीरशैव, मराठवाडा विशेषांक, जून १९९८.